# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९२४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/ससं/आस्था-४/१०२७ दिनांक : २८ ऑगस्ट, २००६

**विषय:** दिनांक २२ ऑगस्ट, २००६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०५ व्या सभेचे इतिवृत्त.

दिनांक २२ ऑगस्ट, २००६ रोजी दुपारी १.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०५ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

(माधव दोमकोंडवार)
सदस्य सचिव

**प्रधान सचिव,**
**पा.पु. व स्व.विभाग :**

**मा. मंत्री,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता,**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. :**

B.M.-105/34

(२)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/बैठक-१०५/२२५/आ-४.                    दिनांक : ७.९.२००६

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष,मंत्रालय, मुंबई-३२
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (उर्जा ) उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१

**विषय :** मंगळवार दिनांक २२.८.२००६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०५ व्या सभेचे इतिवृत्त..

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दिनांक २२.८.२००६ रोजी झालेल्या १०५ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यात येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपला विश्वासू,

( सु.पु. भातखंडे)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**सोबत :**१०५व्या सभेचे इतिवृत्त

..२..

**प्रत,**

**वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.**

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील **कार्यक्रम बाब क्र. ३, ८,९, तसेच आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. ४ व ५ वर** सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ततेचा अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**अधीक्षक अभियंता, (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.**

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या पुढील **कार्यक्रम बाब क्र. ४,६,७ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ व २ तसेच इतिवृत्ताच्या अंतिम पृष्ठावर नमूद केलेल्या १,२,३** वरही सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**अधीक्षक अभियंता, (मुख्यालय), म.जी.प्रा. नवी मुंबई.**

उप मुख्य लेखा अधिकारी - १/२/, म.जी.प्रा., नवी मुंबई.

**आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. नवी मुंबई.**

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेली बाब क्र.**५ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. ३** वर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रशासकिय-नि-आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

कक्ष / कार्यासन अधिकारी, आस्थापना-१/२/३/४/५/६/७.

कायदा व कामगार अधिकारी , म.जी.प्रा. नवी मुंबई यांच्या माहितीसाठी.

**वरील संबंधीत अधिका-यास विनंती करण्यांत येते की, आपल्या कक्षासंबंधी असलेल्या संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरीत कार्यवाही करुन कार्यपुर्ती अहवाल आ-४ शाखेकडे पाठवावेत.**

nng..Sabha..p.६..

(४)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०५ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०५ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२, ऑगस्ट २००६ दुपारी १२.४५ वाजता संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा. श्री. श्री.रणजित कांबळे, राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष
३. मा. श्री. राजेश टोपे, राज्यमंत्री, नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष
४. श्री. विश्वास धुमाळ, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
५. श्री. जे. एम. फाटक, प्रधान सचिव, नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
६. श्री. के. एस वत्स, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
७. श्री. माधव दोमकोंडवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.
८. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे वतीने श्री. शि. म. म्हात्रे, (उप सचिव वित्त) वित्त विभाग.
९. प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे वतीने श्री. प्र. ना. मुदखेडकर, (उप सचिव उर्जा) उर्जा विभाग.
१०. श्री. ग.की वाघ, अवर सचिव, (सचिव सार्वजनिक आरोग्य यांचे वतीने)

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. संजय दहासहस्त्र अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
२. श्री. राजेंद्र होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे .
३. श्री. सागर रानडे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., औरंगाबाद व नाशिक
४. श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागपूर.
५. श्री. व्ही. आर. कल्याणकर, प्रभारी मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री. बा. शि. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
८. श्री. सु. पु. भातखंडे, कायदा व कामगार अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी. म.जी.प्रा., मुंबई.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मा. मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०४ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २५, मे २००६ रोजी झालेल्या १०४ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०४ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.**

मजीप्राच्या १०४ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत करण्यात आल्यानंतर केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरत्या शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीत मान्यता मिळणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळास अवगत केले या अनुषंगाने कार्यक्रम बाबीस जोडलेल्या दिनांक १८.५.२००६ ते २०.८.२००६ या कालावधीत जास्तीत जास्त व्याज दर देणाऱ्या बँकांतर्गत वेगवेगळया कालावधीकरिता करण्यात आलेल्या गुंतवणूकीस मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : राज्यातील पाणी पुरवठा व मलनिःसारण योजनांचे बाबतीत म.जी.प्रा. कडून संशोधन व विकास ( R&D ) कार्यक्रम हाती घेण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. बैठकीतील चर्चेनुसार म.जी.प्रा.ने संशोधन व विकास ( R&D ) कार्यक्रमांतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालये (उदा.IIT व VNIT) व स्वतंत्र सल्लागार (Consultants) यांचेबरोबर सामंज्यस्य करार करावेत तसेच नाशिक संशोधन व प्रशिक्षण केंद्राची ठाणे व

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

नागपूर येथे उपकेंद्रे स्थापन करावीत. तथापि, यासाठी येणारा रु.२.५० कोटी इतका खर्च म.जी.प्रा. स मिळणाऱ्या E.& P. उत्पन्नातून करणे अशक्य असल्याने यातील काही भार शासनाने उचलावा असे मा.सदस्य सचिव यांनी नमूद केले.

सदर चर्चेदरम्यान मा. प्रधान सचिव यांनी असे नमूद केले की, संशोधन व विकास कार्यक्रमांतर्गत आवश्यक असलेल्या निधीसाठी सविस्तर बाब निहाय प्रस्ताव तयार करण्यात यावेत व त्यावर शासन सकारात्मक प्रतिसाद देईल, तसेच केंद्रशासनाकडूनही अर्थसहाय्य मिळविता येईल. सदस्य सचिव यांनी नगर विकास विभागाकडूनही अर्थ सहाय्य मिळू शकेल व ते पाणी पुरवठा विभागाने मिळवून देण्याची विनंती केली. विशेषतः मुख्य अभियंता पुणे, यांनी पुणे शहरातील नदी काठच्या परिसरात असलेल्या वसाहतीमध्ये तसेच नदीकाठच्या गावांमध्ये गॅस्ट्रो सारख्या साथी उद्भवल्या असून अशा ठिकाणी मेंब्रेन फिल्टरचा वापर करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्यात यावा असे निर्देश प्रधान सचिवांनी दिले, तसेच म.जी.प्रा.ने पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, असेही प्रधान सचिवांनी सूचित केले. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा., यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ५ : बदलत्या परिस्थितीत म.जी.प्रा. तील अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे व्यक्तीमत्व, प्रशिक्षण वर्गाद्वारे कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना प्रोत्साहीत करण्याबाबत..**

बदल्या परिस्थितीत स्पर्धात्मक स्थितीत कामे करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचाऱ्याचे शारिरीक स्वास्थ्य, व्यक्तीमत्व विकास, हा ध्यानधारणा, योग साधना इ. अध्यात्मिक प्रशिक्षणाद्वारे घडविणे आवश्यक असून यादृष्टीने सर्वधर्मीयांसाठी खुल्या असणाऱ्या प्रसिध्द संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्याबाबतची सदरची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे प्रस्तावित १५ संस्थांपैकी बऱ्याच प्रशिक्षण संस्थांमध्ये स्वतः प्रशिक्षण घेतले असून त्याचा चांगला अनुभव आला असल्याचेही मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. याअनुषंगाने कार्यक्रम बाबीद्वारे खालील नमूद केलेल्या ४ अटी व शर्तीच्या अधीन राहून प्राधिकरणाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याच्या व प्रोत्साहित करण्याच्या प्रस्तावास ठरावाद्वारे मान्यता देण्यात आली.

१) ज्या प्रशिक्षण वर्गास शुल्क आकारले जाते त्या प्रशिक्षण वर्गाच्या एकूण नोंदणी शुल्काच्या ५०% रक्कमेचा परतावा प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतची खात्री करुन घेऊन

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

संबंधीत कर्मचाऱ्यांना देण्यात येईल. परंतु, ही परताव्याची रक्कम प्रत्येक प्रशिक्षणासाठी रु.५००/- पेक्षा अधिक असणार नाही.

२) या प्रशिक्षण वर्गामध्ये प्राथमिक अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर जो कर्मचारी प्रगत (Advance) अभ्यासक्रम करु इच्छित असेल त्यांनादेखील प्रगत अभ्यासक्रमाच्या नोंदणी शुल्कापैकी ५०% रक्कमेचा परतावा मिळेल. परंतु, परताव्याची ही रक्कम जास्तीत जास्त रु.५००/- इतकी असेल.

३) अशा प्रकारच्या प्रशिक्षण वर्गांना उपस्थित राहण्याची संधी इच्छूक म.जी.प्रा.च्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पूर्ण सेवा कालावधीत जास्तीत जास्त सहा वेळा राहील.

४) या प्रशिक्षण वर्गास हजर राहण्यासाठी प्रशिक्षण वर्गाचा कालावधी, अधिक जाण्या-येण्याचा कालावधी धरुन होणाऱ्या कालावधीसाठी परावर्तीत रजा कर्मचाऱ्यास मंजूर करण्यात येईल. अशा प्रकारच्या रजेसाठी कोणत्याही वैद्यकीय दाखल्याची जरुरी भासणार नाही.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा., यांना प्राधिकृत करण्यात येत आले.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : राज्यशासन पुरस्कृत "महाजल" योजनेअंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजना ९% आस्थापना शुल्क आकारणी करुन "पूर्ण ठेव तत्वावर" म.जी.प्रा. मार्फत राबविणे बाबत.**

म.जी.प्रा. च्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने आष्टी व आरमोरी या गावासाठीच्या मंजूर योजना "महाजल" कार्यक्रमांतर्गत पूर्ण ठेव तत्वावर ९% आस्थापना शुल्क आकारुन राबविण्याचे प्रस्तावित असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळासमोर विषद केले. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली. व या अनुषंगाने संबंधित ग्रामपंचायतीकडून म.जी.प्रा. स निधी प्राप्त झाल्यानंतर कामाच्या निविदा मागविण्याची कार्यवाही मुख्य अभियंता, यांनी करण्यासही मान्यता देण्यात आली. सदरहू योजनांसाठी/तत्सम् योजनांसाठी उर्वरित शुल्कांबाबत शासन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रोत्साहन निधी देण्याचा विचार करील असे प्रधान सचिवांनी सुचविले.

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

त्याचप्रमाणे राज्यातील "महाजल" तसेच तत्सम शासकीय कार्यक्रमांतर्गत यापुढेही म.जी.प्रा.कडे प्रस्तावित इतर पाणी पुरवठा योजनाही ९% आस्थापना शुल्क आकारुन पूर्ण ठेव तत्वावर राबविण्याही मान्यता देण्यात आली व या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : अहेरी (ता. अहेरी, जि.गडचिरोली) पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना म्हणून हाती घेण्याबाबत.**

केंद्र पुरस्कृत वर्धित वेग कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या रु.३०८.७५ लक्ष किमतीच्या योजने अंतर्गत देय असलेली लोकवर्गणीची रक्कम रु.३०.८७ लक्ष ही जास्त असल्याने मागील दीड वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करुनही उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे योजनेच्या कामास अद्याप सुरुवात करण्यात आलेली नाही. त्यातच केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या सर्व योजना मार्च-२००७ पूर्वी कार्यान्वित करण्याचे बंधनकारक करण्यात आले असून, जर यापूर्वी योजना कार्यान्वित झाली नाही तर, त्या योजनेसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान सव्याज केंद्र शासनास परत करावे लागणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायत तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीही सदरची योजना म.जी.प्रा.ने स्वत:ची योजना म्हणून हाती घेण्याबाबत मागणी केली आहे.

चर्चेत सदरहू गावास पिण्याच्या पाण्यासाठी वंचित ठेवणे योग्य होणार नाही, असे ठरले व वरील सर्व बाबीचा विचार करुन सदरची योजना म.जी.प्रा. ची योजना म्हणून १०% लोकवर्गणी प्राधिकरणाने त्यांचे स्वनिधीतून अथवा कर्ज रुपाने उपलब्ध करुन योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर अस्तित्वातील योजनेतील वितरण व्यवस्था व त्यावरील नळ जोडण्या ताब्यात घेवून नागरिकांना खाजगी नळ जोडणीद्वारे आवश्यक पाणीपट्टीचे दर आकारुन राबविण्याचे प्रस्तावित केले असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळासमोर विषद केले.

यावर सविस्तर चर्चा होवून कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात आली. सदर योजनेची कामे शक्यतो नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान पूर्ण करण्याचे प्रयत्न करावेत असे मा.प्रधान सचिव यांनी सूचविले. तथापि, मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नागपूर यांनी क्षेत्रिय अडचणीचा विचार करता यावेळेपर्यंत योजना पूर्ण करता येणे अशक्य आहे, मात्र माहे मार्च २००७ पर्यंत निश्चितपणे पूर्ण करण्यात येईल असे निदर्शनास आणून दिले. *त्याचप्रमाणे मा.प्रधान सचिव यांनी म.जी.प्रा.ने लोकवर्गणीपोटी उभारावयाचा १०% इतका निधी, सदर गाव/योजना T.S.P. अंतर्गत येत असल्यास तसा प्रस्ताव शासनास पाठवून उपलब्ध करुन*

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

घेण्याचे निर्देश दिले. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास तसेच प्रस्ताव शासनास सादर करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : E.& P. दराचा आढाचा.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी पुरवठा मलनिःसारण योजनांसाठी E.&P. १७.५% या दराने आकारते. तथापि हा दर नोशनल स्वरुपाचा झाला असून या दराने करावयाची कामे आता फारच कमी असून विविध कार्यक्रमांतर्गत, जसे खासदार निधी, आमदार निधी, राष्ट्रीय नदी कृती योजना, पूर्ण ठेव योजना, इत्यादीसाठी ४% पासून १४% पर्यंत E.& P. चा दर आकारुन कामे केली जात आहेत. याबाबतचा आढावा घेण्यात येऊन E.& P. द्वारे मिळणारे उत्पन्न हे म.जी.प्रा. च्या आस्थापनेवर होणाऱ्या खर्चापेक्षा कमी आहे व त्यामुळे दिवसेंदिवस म.जी.प्रा.ची आर्थिकस्थिती बिकट होत आहे. तथापि, काही प्रमाणात तूट भरुन काढण्यासाठी १७.५% पेक्षा कमी दरानेही म.जी.प्रा. कामे करीत आहे. असे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणले.

तथापि काही नगरपालिका /महानगरपालिका यांनी म.जी.प्रा.चा १७.५% हा दर जास्त असून म.जी.प्रा. स कामे देणे परवडत नाही असा सूर लावण्यात येतो. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागाकडून दिल्या जाणाऱ्या कामासाठी म.जी.प्रा. च्या १७.५% दरापेक्षा जास्त दराने E.& P. आकारली जाते. तेंव्हा म.जी.प्रा.स हा दर कमी करावयाचा झाल्यास शासनाने जास्तीत जास्त कामे म.जी.प्रा.स मिळवून द्यावी किंवा खालील प्रस्ताव विचारार्थ व निर्णयात कार्यक्रम बाबीद्वारे सादर करण्यात आल्याचे मा.सदस्य सचिव यांनी नमूद केले.

१) १७.५% E.&.P. पैकी ५.५% रक्कम ही सेवा निवृत्ती व निवृत्ती विषयक लाभासाठी असून या खर्चाची जबाबदारी शासनाने उचलल्यास म.जी.प्रा.स १२% E.&.P आकारता येईल.

२) शासनाने म.जी.प्रा. च्या आस्थापना, निवृत्तीवेतन त्याचप्रमाणे प्रशासकीय खर्चाची जबाबदारी स्वीकारावी. सध्याच्या म.जी.प्रा.चे. E.&.P द्वारे मिळणारे उत्पन्न शासनाच्या तिजोरीत जमा करावे.

३) पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागा प्रमाणे आस्थापना, निवृत्तीवेतन त्याचप्रमाणे प्रशासकीय खर्चाची जबाबदारी योजनाबाहय

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

तरतूदीतून शासनाने स्विकारल्यास प्राधिकरणामार्फत करण्यात येणाऱ्या कामाचा जो काही E.&.P दर शासन ठरवेल त्या दराने कामे करुन येणारे उत्पन्न शासनाचे तिजोरीत जमा करेल.

यावर चर्चा करताना, मा.प्रधान सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुनर्गठना संबधी व्हावयाच्या संभाव्य बैठकीमध्ये यावर चर्चा होणार असून या बैठकीत जो काही निर्णय होईल त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद केले.

. चर्चे अंती कार्यक्रम बाबीव्दारे सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यतादेण्यात येवून या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले

**कार्यक्रम बाब क्र. ९ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या औरंगाबाद येथील (वेदांत नगर सिटी सर्व्हे क्र. १८,३११) या ३,६५६ चौ.मीटर मालकीच्या जागेच्या संरक्षणासाठी संरक्षित भिंत घालणे व या जागेचा "बांधा, वापरा व हस्तांतरण करा" या तत्वावर विकास करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) इच्छुक विकासकाकडून मागविणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची औरंगाबाद येथे (वेदांत नगर सिटी सर्व्हे क्र. १८,३११) ३,६५६ चौ.मीटर मालकीची जागा असून सदरची जागा बऱ्याच न्यायालयीन प्रकरणानंतर म.जी.प्रा.च्या नावे झाली असून सदर जागेची सध्याच्या बाजार भावानुसार किंमत रु.२.०० कोटी एवढी आहे. तथापि, या जागेवर आसपासच्या लोकांकडून अतिक्रमण होवू नये म्हणून सद्य:स्थितीत संरक्षक भिंत बांधून पुढे या जागेचा "बांधा, वापरा व हस्तांतरण करा" या तत्वावर विकास करण्याचे प्रस्तावित असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळासमोर विषद केले.

यावर मा.अध्यक्ष, यांनी सदर जागेच्या किंमतीचा विचार करता, सदर जागेवर तातडीने चांगल्या प्रकारे भिंत बांधून या जागेचा **"बांधा, वापरा व हस्तांतरण करा"** या तत्वावर विकास करण्याचे निर्देश दिले. सदर चर्चे दरम्यान पुणे येथील म.जी.प्रा.च्या मालकीच्या जागेचाही विकास करण्याबाबत यापूर्वी संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय झाला असून त्यावर अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे मा.अध्यक्षांनी निदर्शनास आणून दिले. यावर मुख्य अभियंता, पुणे यांनी तातडीने कार्यवाही करण्यात येत असल्याचे नमूद केले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

चर्चे अंती कार्यक्रम बाबीव्दारे सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यतादेण्यात येवून या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले

**आयत्यावेळीची कार्यक्रम बाब १: नरखेड पाणी पुरवठा योजने अंतर्गत आस्थापना व अवजारे शुल्क कमी करण्याबाबत.**

केंद्र पुरस्कृत वर्धित वेग नागरी पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या व प्रगतीपथावर असलेल्या नरखेड वाढीव पाणी पुरवठा योजनेवरील आस्थापना व अवजारे शुल्कापोटी आकारण्यात आलेले शुल्क कमी करण्याबाबत अध्यक्ष, नगरपरिषद नरखेड यांनी मा.मुख्यमंत्री यांना विनंती केली होती. त्यामुळे मा.प्रधान सचिव यांनी सदर बाब कार्यक्रम बाबीद्वारे संचालक मंडळासमोर सादर करण्याचे निर्देश दिले होते. यासाठी सदरची बाब सादर करण्यात आल्याचे मा. सदस्य सचिव यांनी नमूद केले.

चर्चे दरम्यान मा.सदस्य सचिव यांनी असे नमूद केले की, म.जी.प्रा.स नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मिळणाऱ्या E.& P. शुल्कामधून मिळणाऱ्या उत्पन्नातूनच कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते तसेच अनुषंगीक खर्च भागवावा लागतो, त्यामुळे नगरपरिषदेने मागणी केलेले E.& P. शुल्क कमी करता येणे अशक्य आहे. चर्चे दरम्यान मुख्य अभियंता, नागपूर यांनी सदर योजनेसाठी मिळणारे E.& P.शुल्क हे बव्हंशी केंद्र शासन व राज्य शासनाच्या अनुदानातून देय असून त्याचा भार नगरपरिषदेने देय असलेल्या लोकवर्गणीमधून नगण्य प्रमाणातच पडणार आहे लोकवर्गणीचे हे प्रमाण एकूण किमतीच्या केवळ ३.२४% असल्याचे तसेच नरखेड नगरपरिषदेस हे शुल्क कमी केल्यास इतरही नगरपरिषदा अशीच मागणी करतील, असे निदर्शनास आणले. या सर्व बाबीवर चर्चा होवून नगरपरिषदेची मागणी अमान्य करण्यात आली असून तसे नगरपरिषदेस कळविण्याचे निर्देश देण्यात आले.

**आयत्यावेळीची कार्यक्रम बाब २: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे वेणा पाणी पुरवठा केंद्रा अंतर्गत वाडो गावापैकी आदर्श नगर, दत्तवाडो वार्ड क्र.३ (संपूर्ण), व नवीन शक्तीनगर या तीन भागाची वितरण व्यवस्था थेट ग्राहकापर्यंत प्राधिकरणामार्फत राबविण्याबाबत.**

वेणा पाणी पुरवठा केंद्र प्राधिकरणाच्या मालकीचे असून त्याची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती प्राधिकरणामार्फत करण्यात येते. या केंद्रातून म.जी.प्रा. मार्फत वाडी गावास ५ नळ

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

जोडण्याद्वारे दैनंदिन १.५० द.ल.लि. ठोक स्वरुपाचा पाणी पुरवठा करण्यात येतो व सदर पाणी पुरवठया करीता ग्रामपंचायत पाणीपट्टी आकारुन वसुली करीत आहे. तथापि ग्रामपंचायतील वार्षिक रु.२० ते २१ लक्ष एवढी वसुली करीत असूनहो वर्षाला सरासरी रु.४ ते ५ लक्ष इतकीच रक्कम म.जी.प्रा. स अदा करीत आहे. त्यामुळे थकबाकी वाढत जाऊन आजमितीस सुमारे रु.६.२२ कोटी इतकी थकबाकी ग्रामपंचायतीकडे प्रलंबित आहे. त्यामुळे वेणा पाणी पुरवठा केंद्राची क्षमता असूनही नागरीकांना पुरेसा पाणी पुरवठा होवू शकत नाही. त्यामुळे ७५ ते ८०% ग्राहकांनी सदरची योजना म.जी.प्रा. ने चालविण्याबाबत सहमती दर्शविले असल्याचे तसेच यासाठी आवश्यक तो ठराव ग्रामपंचायत वाडी यांनी दिला असल्याचे मुख्य अभियंता, यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणले. त्याचप्रमाणे सदर अंमलबजावणीस केवळ २ जलमापक वाचक व २ जलसेवक लागतील व सदरचे कर्मचारी वेणा पाणी पुरवठा केंद्रावर उपलब्ध असल्याने म.जी.प्रा.स जास्तीचा खर्च उपलब्ध करावा लागणार नाही व म.जी.प्रा.स दरवर्षी सुमारे ६.२० लक्ष उत्पन्न मिळेल असेही नमूद केले.

वरील बाबीचा विचार करुन वेणा पाणी पुरवठा केंद्रातून वाडी गावाची वितरण व्यवस्थेसह योजना थेट ग्राहकापर्यंत राबविण्याकरीता प्रथम टप्प्यात वाडी भागातील आदर्श नगर,दत्तवाडी वार्ड क्र.३ (संपूर्ण), व नवीन शक्तीनगर या तीन भागाची वितरण व्यवस्था पाणीपट्टी वसूलीसह राबविण्यास संचालक मंडळाची मान्यता घेण्यासाठी सदर बाब सादर केल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर बाबींवर चर्चा होवून योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याकरीता वेळोवेळी पाणीपट्टीच्या दरात सुधारणा करण्यात यावी, असा निर्णय होवून सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान केली आहे. यासाठीची पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्यावेळीची कार्यक्रम बाब ३: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुनर्गठनाबाबत व त्या दृष्टीने सुरु असलेल्या वाटचालीबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुनर्गठनाबाबत व त्या दृष्टीने म.जी.प्रा. मार्फत सुरु असलेल्या वाटचालीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रमबाबीद्वारे सादर केलेल्या ठरावातील शिफारशीचा थोडक्यात परामर्श सदस्य सचिव यांनी करुन दिला. त्याचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

१) शासनाचे अनुदान जेथे दिले जाते त्या प्रकल्पाची योग्यता तपासणे तसेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळी नेमून दिलेली कामे करण्यासाठी प्रत्येक जिल्हयात एका विभागाची निर्मिती करणे व यातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा भार शासनाने उचलावा.

२) सध्या जे अभियंते/ कर्मचारी अतिरिक्त आहेत व ज्यांनी विकल्प दिला आहे त्यांना शासनाच्या इतर विभागात रिक्त पदांवर कायमस्वरुपी सामावून घेणे.

३) असे कर्मचारी कायमस्वरुपी समाविष्ठ होईपर्यंत किंवा सेवानिवृत्तीद्वारे अशा कर्मचाऱ्यांची संख्या शून्य होईपर्यंत त्यांच्या वेतनाचा भार शासनाने उचलावा.

४) भविष्यातील कंपनीस स्पर्धात्मक कामे मिळू शकण्यासाठी जुना बोजा तसेच अस्तित्वातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा निवृत्तीवेतनाचा बोजा शासनाने उचलावा.

यावरील चर्चे दरम्यान, मा.प्रधान सचिव यांनी म.जी.प्रा.ने BOT Operstor म्हणून काम करणे आवश्यक आहे, असे निर्देश दिले, तसेच याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुनर्गठना संबधी व्हावयाच्या संभाव्य बैठकीमध्ये यावर चर्चा होणार असून या बैठकीत जो काही निर्णय होईल त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद केले. तथापि त्यांनी असेही नमूद केले की, सद्यःस्थितीत केवळ अभियंताच प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात येतात, मात्र सद् अभियंते म.जी.प्रा. मध्ये कार्यरत असताना त्यांच्या सोबत अथवा हाताखाली असलेल्या कर्मचाऱ्यांना (Supporting Staff) देखील प्रतिनियुक्तीवर अथवा कायमस्वरुपी पाठविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचेआहे ज्यामुळे आज जो कर्मचारी वर्ग अतिरिक्त दिसत आहे तो दिसणार नाही. त्यावर तशा प्रकारचा सविस्तर प्रस्ताव ग्राम विकास विभागाकडे सादर केलेला असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले.

चर्चे अंती कार्यक्रम बाबीव्दारे सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यतादेण्यात येवून या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्यावेळीची कार्यक्रम बाब ४: नागरी योजनांचा किमान टप्पा (Priority Componant ) कार्यान्वित करण्यासाठी अधिकचे आवश्यक कर्ज मिळणेबाबत.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी शासकीय अनुदान उपलब्ध असूनही वित्तीय आकृतीबंधानुसार शासकीय अनुदानाच्या तुलनेत नगरपरिषदेने

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

उभारावयाच्या कर्जाच्या अनुपलब्धतेमुळे बऱ्याचशा प्रगतीपथावरील योजनांची कामे खोळंबली आहेत व त्यामुळे बराचसा निधी गुंतला असूनही त्याचा फायदा नागरीकांना पाणी पुरवठा करुन देता येत नाही. याबाबीचा विचार करुन प्राधिकरणाच्या दि.२८.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये अशा २३ नागरी योजनांचा किमान टप्पा कार्यान्वित करण्यासाठी म.जी.प्रा.कडे उपलब्ध असलेले शासकीय अनुदान या योजनांसाठी उपलब्ध करावयाच्या कर्जापोटी हुडकोच्या कर्जासाठीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून नगरपरिषदेस उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव सादर करुन मान्यता प्राप्त करुन घेण्यात आला आहे. व त्याच अनुषंगाने आता १८ योजनांचा प्रस्ताव या बाबीद्वारे मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये मा.अध्यक्ष यांनी नगरपरिषदेस कर्जापोटी उपलब्ध करुन देण्यात येणा-या रकमेच्या परतफेडीबाबतची शाश्वता काय या बाबत विचारणा केली असता, सदर परतफेडीबाबत नगरपरिषदेशी करावयाच्या ESCROW अकाँउट कराराबाबत अवगत केले. त्याचबरोबर यापूर्वी मान्यता प्राप्त करुन घेतलेल्या २३ योजनांच्या बाबतीत नगरपरिषदांनी म्हणावा तसा प्रतिसाद दिला नसल्याचे मा.सदस्य सचिव यांनी निदर्शनास आणून दिले. यावर मा.अध्यक्ष, यांनी त्यांच्या सहीने, अशा नगरपरिषदांना याचा फायदा योजनांसाठी घेण्याबाबत पत्र पाठवून, कळविण्याचे निर्देश दिले आहेत. चर्चेदरम्यान मा.प्रधान सचिव यांनी असेही नमूद केले की, ज्यांना हे कर्ज उपलब्ध करुन दिले जाईल, त्या नगरपरिषदांनी त्यांच्या नगरपालिका क्षेत्रात स्वच्छतेसाठीचे कार्यक्रमही राबविले जातील, याचीही हमी घेण्यात यावी. याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्यावेळीची कार्यक्रम बाब ५: निविदेच्या खंड -३८ तसेच अतिरिक्त बाबीच्या (Extra Item) मंजूरीच्या अधिकारात वाढ करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत कार्यरत कार्यकारी अभियंत्यांना नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा तसेच नागरी मलनि:सारण योजनांची कामे राबवितांना निविदेच्या परिमाणामध्ये वाढ झाल्यास खंड-३८ अंतर्गत तरतुदीनुसार कोणतेही अधिकार नसून अतिरिक्त बाब दर सूचीसाठी केवळ रु.२५,०००/- पर्यंतच्या कामासाठी मंजूरीचे अधिकार आहेत व हे अधिकार निर्गमित होवून बराच कालावधी लोटला आहे. दरम्यानच्या काळात चलनफुगवटा रुपयाचे अवमुल्यन त्याचप्रमाणे भाववाढ इ.बाबीमुळे कामाच्या किमतीमध्ये बरीच वाढ झाली आहे. सहाजिकच अप्रत्यक्षरित्या मंजूरीचे अधिकारामध्ये कपात झाली आहे. परिणामी अतिरिक्त बाब दरसूची प्रकरणात कार्यकारी अभियंता यांचे अधिकारात असलेली प्रकरणे वरिष्ठांच्या

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

अधिकारात येत असल्याने अशी प्रकरणे बऱ्याच कालावधीसाठी प्रलंबित राहत आहेत व राहतात असे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळाचे निदर्शनास आणले.

त्यामुळे कार्यकारी अभियंतांच्या मंजूरीच्या अधिकारात दोन्ही प्रकरणात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला असून खंड-३८ साठी रु.३.०० लक्ष (वाढीव परिमाणांच्या प्रस्तावांच्या मंजूरीमुळे योजनेच्या किंमतीत वाढ होवू नये यास अधीन राहून ) व अतिरिक्तबाब दरसूची साठी रु.५०,०००/- व एकूण रु.१०.०० लक्ष (प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.५०,०००/- पण सर्व अतिरिक्त बाबीवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.१० लक्ष पर्यंत वा एकूण अतिरिक्त बाबींच्या मंजूरीमुळे योजनेस प्रशासकीय मान्यतेच्या किमतीमध्ये वाढ होवू नये यापैकी जी कमी असेल त्या मर्यादेपर्यंत या अटीच्या अधीन राहून.) असे प्रस्तावित आहे.

यावर चर्चा होवून सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली असून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर बैठकीमध्ये कार्यक्रम बाबीव्यतिरिक्त काही बाबींवर मा.अध्यक्ष तसेच मा.प्रधान सचिव, यांनी निर्देश दिले आहेत. त्याचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

१) राज्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बऱ्याच पाणी पुरवठा योजनांचे नुकसान झाले असून, अशा योजनांबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करुन अशी कामे पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडून प्रस्ताव मान्य करुन घेऊन निधी उपलब्ध करुन घ्यावा, असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.

२) मा.राज्यमंत्री, यांनी जालना पाणी पुरवठा योजना UIDSSMT अंतर्गत सादर करण्याबाबत अवगत केले यावर चर्चा झाली त्यावर मा.अध्यक्ष यांनी जालना सोबत धुळे, परभणी, मनमाड, यवतमाळ, नगर, या मोठ्या योजनांचाही समावेश करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश दिले आहेत. यावर सदस्य सचिव यांनी यातील यवतमाळ व परभणी, सादर केली असून जालना योजना सादर करण्याचे निर्देश क्षेत्रिय अधिकाऱ्यांना पूर्वीच दिले असल्याचे सांगितले, तसेच उर्वरित योजना पाठविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे सांगितले.

३) मा.प्रधान सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण केल्यानंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस हस्तांतरीत केली जाते, तथापि पुढे या योजना म्हणाव्या तशा नगरपरिषदेमार्फत तांत्रिक कर्मचाऱ्या अभावी सक्षमतेने चालविल्या जात नाहीत. तेंव्हा म.जी.प्रा.ने या क्षेत्रातही BOT Operators संकल्पनेनुसार अशा हस्तांतरीत केलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करावेत असे नमूद केले.

चर्चेकरिता आणखी विषय नसलेमुळे उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषीत केले.

(स्वाक्षरी) (स्वाक्षरी)

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.